**सन २०१७-१८ मध्ये राष्ट्रीय कृषि विकास योजनेअंतर्गत "उन्नत शेती समृध्द शेतकरी मोहिम अंतर्गत कृषि जन जागृती प्रकल्प" राबविण्यास सुधारित प्रशासकीय मान्यता देण्याबाबत ...**

**महाराष्ट्र शासन**

**कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग**

**शासन निर्णय क्रमांकः कृविका ०५१७ /प्र.क्र.७५ /३-अे**

मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,

मंत्रालय विस्तार, मुंबई ४०० ०३२

दिनांक : १९ सप्टेंबर, २०१७

वाचा :

१. कृषि व पदुम विभागाचा शासन निर्णय क्र.कृविका ०३१७/ प्र.क्र.१८ /राकृवियो कक्ष, दि. १३.४.२०१७

२. कृषि व पदुम विभागाचा शासन निर्णय क्र.कृविका ०५१७/प्र.क्र.७५ /३ अे, दि. १.८.२०१७

३. संचालक (विस्तार व प्रशिक्षण) यांचे पत्र क्र. कृमावि/विप्र-४/सु. आराखडा/५५२/२०१७, दि.२४.८.२०१७

**प्रस्तावना :**

सन २०१७-१८ मध्ये राष्ट्रीय कृषि विकास योजनेंतर्गत " उन्नत शेती समृध्द शेतकरी मोहिम अंतर्गत कृषि जन जागृती प्रकल्प राबविण्यासाठी उपरोक्त संदर्भाधिन क्र. २ च्या शासन निर्णयाअन्वये ₹. ४००.०० लक्ष एवढ्या प्रकल्प खर्चास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली होती. तथापि " उन्नत शेती -समृद्ध शेतकरी पंधरवडा" आयोजनाचा कालावधी होऊन गेल्याने तसेच याबाबत केलेल्या खर्चापोटी क्षेत्रिय पातळीवरुन कोणीही मागणी केलेली नसल्याने प्रशासकीय मान्यता देण्यात आलेल्या बाबींमध्ये बदल करण्यात आला असल्याने सन २०१७-१८ मध्ये राष्ट्रीय कृषि विकास योजनाअंतर्गत" उन्नत शेती - समृद्ध शेतकरी” मोहिम अंतर्गत कृषि जनजागृती प्रकल्प राबविण्यासाठी सादर करण्यात आलेल्या सुधारित आराखडयास प्रशासकीय मान्यता देण्याबाबत संचालक ( विस्तार व प्रशिक्षण ) यांनी संदर्भाधिन क्र. ३ च्या पत्रान्वये शासनास विनंती केली होती . तदनूषंगाने, या प्रकल्पास सन २०१७-१८ करिता सुधारित प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती . तदनुसार शासन पुढीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

**शासन निर्णय:-**

सन २०१७-१८ मध्ये राष्ट्रीय कृषि विकास योजनेअंतर्गत "उन्नत शेती समृध्द शेतकरी मोहिम अंतर्गत कृषि जन जागृती प्रकल्प "राबविण्यासाठी ₹. ९५.९५ लक्ष (अक्षरी रुपये पच्च्यानव लक्ष पच्चानव हजार फक्त) एवढ्या प्रकल्प खर्चास सुधारित प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे . प्रशासकीय मान्यतेचे सुधारित भौतिक व आर्थिक घटक सोबतच्या तक्त्यात क्र.१ ते क्र.४ येथे नमूद करण्यात आले आहेत.

**(रु. लाखात)**

| स. क्र. | **घटक** | **केंद्र / राज्य शासनाच्या चालू योजनांसाठी लागू** | | |
|---|---|---|---|---|
| | | नाव | अनुदानासाठी मापदंड | सुधारित आराखड्यानूसार एकुण किमंत |
| १. | राज्यस्तरीत्य कार्यशाळा / चर्चासत्राचे आयोजन | आत्मा अ-१(अ) | @ ०.७५ लक्ष | ६.०० लक्ष |
| २. | अ) प्रिंट मिडीया , आकाशवणी , दुरदर्शन , वर्तमानपत्रांमधून स्थानिक जाहिराती तसेच तंत्रज्ञान प्रचार व प्रसिद्धी | आत्मा ब-९ | @२.०० लक्ष ( जास्तीत जास्त ४.०० लक्ष ) | ६४.०० लक्ष |
| | ब) कमी खर्चाची प्रकाशने | आत्मा ब-९ | @०.७२ लक्ष | ००.०० लक्ष |
| ३ | नाविन्यपुर्ण घटक (चित्ररथ -२०१७) | आत्मा इ-१ | @२५.०० लक्ष | २५.०० लक्ष |
| ४ | प्रशासकीय निधी / आकस्मिक खर्च १% | - | - | ०.९५लक्ष |
| | **एकुण** | -- | - | **९५.९५ लक्ष** |

तसेच उपरोक्त नमूद तकत्यातील घटक २ अ) अंतर्गत राबवयाच्या रु. ६४ लक्ष रुपयाच्या खालील नमूद बाब निहाय सुधारित कार्यक्रमास प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

**(रु. लाखात)**

| अ.क्र. | घटक / बाब | सुधारित तरतुद |
|---|---|---|
| अ-१ | ओबी व्हॅनद्वारे चित्रीकरण | ३.०० |
| अ-२ | आकाशवाणीवरील शेतशिवार कार्यक्रम | ३३.५० |
| अ-३ | विविध प्रकाशने छपाई | १७.५० |
| अ-४ | वर्तमानातुन प्रसिद्ध झालेल्या दोन जाहिराती | १०.०० |
| | एकूण रुपये | ६४.०० |

**२.** सदर प्रकल्प राबविण्यासाठी संचालक ( विस्तार व प्रशिक्षण) यांना कार्यक्रमाचे कार्यान्वयन तसेच संनियंत्रण करण्यासाठी प्राधिकृत करण्यात येत आहे. त्यानुषंगाने संचालक ( विस्तार व प्रशिक्षण) यांनी प्रस्तुत प्रकल्प राबविण्याकरीता संदर्भ क्र. १ येथील शासन निर्णयान्वये" उन्नत शेती समृध्द शेतकरी मोहिम " राबविण्यासाठी निर्गमीत केलेल्या मार्गदर्शक सूचनांचा अवलंब करावा.

**३.** या शासन निर्णयान्वये प्रकल्प राबविण्यासाठी चालू वर्षी उपलब्ध करुन देण्यात येत असलेला ₹. ९५.९५ लक्ष निधी या चालू वित्तीय वर्ष अखेर पर्यंत खर्च करावा. तसेच संचालक ( विस्तार व प्रशिक्षण ) यांनी निधी विनियोगाची उपयोगिता प्रमाणपत्रे शासनास वेळोवेळी सादर करण्याची कार्यवाही करावी.

**४.** हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७०९१९१२४३५९८००१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Chandrakumar Vithal Ghaytadak

Digitally signed by Chandrakumar Vithal Ghaytadak
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Agriculture And ADF Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=034948ccd1f6b6c67380c817b34a9af75fcfa679a4609321f9da27d9ab87b0d1, cn=Chandrakumar Vithal Ghaytadak
Date: 2017.09.19 12:34:25 +05'30'

**(चं.वि.घायतडक)**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति-**

१. आयुक्त,कृषि,महाराष्ट्र राज्य,पुणे
२. संचालक विस्तार व प्रशिक्षण तथा कृषि नोडल अधिकारी,कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य,पुणे,

**प्रत,**

१. मा.मंत्री (कृषि) यांचे खाजगी सचिव
२. मा.राज्यमंत्री (कृषि) यांचे खाजगी सचिव
३. महालेखापाल, (लेखा परीक्षा/ लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१ मुंबई
४. महालेखापाल, (लेखा परीक्षा / लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-२ नागपूर
५. महासंचालक, वसंतराव नाईक राज्य कृषि विस्तार व्यवस्थापन प्रशिक्षण संस्था, व्हीआयपी रोड धरमपेठ, नागपूर
६. सर्व संचालक / कृषि सह संचालक, कृषि आयुक्तालय,महाराष्ट्र राज्य, पुणे
७. सर्व विभागीय कृषि सह संचालक
८. महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय,मुंबई.
९. अवर सचिव /कार्यासन राकृवियो, कार्यासन २ अे, कृषि व पदुम विभाग, मंत्रालय,मुंबई ३२.
१०. वित्त विभाग कार्यासन व्यय-१/ अर्थ-३, नियोजन विभाग कार्यासन १४३१, मंत्रालय,मुंबई ३२.
११. निवड नस्ती (का.३ अे).

* * *